**<u>नि. फौ. खटला क्र.११३/२०२२</u>**

**<u>निशाणी क्र.७३</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : दयानंद मारोती कांबळे,

**<u>वय</u>** : ४० वर्षे, **<u>धंदा</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

मी सर्व आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावातील रहिवासी आहेत. ते न्यायालयामध्ये हजर आहेत. त्यापैकी गोविंद बाबुराव कांबळे मयत आहेत. रुक्मीनबाई विठ्ठलराव शिंदे गैरहजर आहे. (अर्ज निशाणी ७२ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.१२ रुक्मीनबाईची गैरहजेरी माफ केलेली आहे.)

०२. दि.२८/०५/२०२२ रोजी रात्री ७.३० ते ८.०० वाजताच्या दरम्यान माझ्या शेतात घटना घडली. मी त्यादिवशी निवृत्ती रामराव सोमवंशी यांचा ट्रॅक्टर घेऊन शेतामध्ये नांगरटी करीत होतो. त्यावेळी आरोपी माणिकप्रभू व सुकुमार हे ईतर दहा ते बारा अज्ञान व्यक्तींना घेऊन तेथे आले होते. आरोपी माणिक व सुकुमार यांनी मला मुक्कामार दिला, माझ्या पँटच्या मागच्या खिशातील ₹२०,०००/– काढून घेतले. आरोपी सुकुमारने चाकू काढला. त्यामुळे मी तेथून पळून गेलो. त्यानंतर मी घरी गेलो. मला घरी रक्ताची उलटी झाली. त्यामुळे माझे आई व बहीण आरडाओरड करीत होते. त्यानंतर आजय हरीबा भंडे आणि बिरबल मसनाजी म्हेत्रे हे तेथे आले. त्यांनी मला उदगीर येथील दवाखान्यात नेले.

०३. माझी आई, बहीण आणि लहान भाऊ हे सदर हकीकत सांगण्यासाठी मोठा भाऊ गौतम मारोती कांबळे यांना सांगण्यासाठी त्यांच्या घरी गेले होते. आरोपींनी सदर घरी घेरा टाकला. त्यांनी ''ये रे मादरचोद, तुझ्या भावाला खपवण्यासाठी शेतात गेलो होतो, तुझ्या भावाचे तुकडे तुकडे करून जवळच्या तळ्यात टाकतो'' असे म्हणून धमकी दिली. आम्ही अगोदर तुम्हाला खपवण्यासाठी फिल्डिंग लावलो आहे असे सर्व आरोपी म्हणत

होते. मी दुसऱ्या दिवशी दवाखान्यामधून पोलीस ठाण्यामध्ये गेलो. पोलिसांनी मला दवाखान्यात जाण्यासाठी पत्र दिले. त्यानंतर मी दवाखान्यात गेलो. मी पुन्हा पोलीस ठाण्यामध्ये गेलो आणि घटनेबाबत खबर दिली. आता मला खबर दाखविली. ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७४** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.२ ते ६ व ८ ते १३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एन.एल. मध्वरे यांच्यामार्फत ::**

०४. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि आमच्यामध्ये उदगीर येथील न्यायालयामध्ये दिवाणी दावा प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपी त्या दाव्यामध्ये प्रतिवादी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये जुना सर्वे क्र.९६ नवीन सर्वे क्र.७९ चा वाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा मालकी घोषित होऊन ताबा मिळण्याबाबत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वर्ष २०२० मध्ये मनाईहुकूमाचा अर्ज नामंजूर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी किरकोळ दिवाणी अपील क्र.२१/२०२१ हे दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी दुसऱ्यांदा सदर दाव्यामध्ये मनाईहुकूमाचा दावा दाखल केला होता.

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी सर्वे क्र.९६ च्या संबंधाने फेरफार क्र.२०७, ३३३, ४०९, ९२५, १००० हे रद्द होण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे विलंब माफीचा अर्ज केला होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सदर अर्ज फेटाळल्यामुळे मी त्याविरुध्द अपील केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी सदर अपील खारीज केलेले आहे. मी त्याविरुध्द आयुक्त औरंगाबाद येथे अपील केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आयुक्तांनी सदर अपील खारीज केले. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कायम केला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुध्द सर्व निकाल गेल्याने मी खोटी खबर दिली.

०६. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये आरोपींनी मारहाण केल्याबाबत आणि ₹२०,०००/– काढून घेतल्याबाबत खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना खोट्या केसमध्ये गोवले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१० ते १२ नामे वच्छलाबाई, राजाबाई व रुक्मीनबाई यांना चालता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमिनीचा वाद मिटविण्यासाठी आणि केसेस काढून घेण्यासाठी मी खोटी केस केली आणि खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

**:: आरोपी क्र.१, ९, १४ व १५ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत ::**

०७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१४ व १५ नामे गोविंद आणि सावित्रा हे जन्मापासून अपंग आहेत व त्यांना चालता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ माणिकप्रभू ला बीपीचा मोठा त्रास आहे. जळबा भुताळे हे आरोपी क्र.१ व १४ चे वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जळबा भुताळेच्या नावे सर्वे क्र.७९/३ मध्ये ० हे. ९२ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, जळबाच्या मृत्यूनंतर माणिकप्रभू, गोविंद व ईतर यांच्या नावे वारसाचा फेरफार झाला. हे म्हणणे खरे नाही की, जमीन हडप करण्यासाठी मी खोटी खबर दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन हडप करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.०२/०१/२०२६.